महाराष्ट्र शासन (स्थापित)

फोन : २६०५४५१२
२६०५३२१५
फॅक्स : २६०५३२१५

# पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे
# PUNE DISTRICT SECURITY GUARD BOARD, PUNE

स्थापना : २००३

**Constituted under Section 6 (1) of the Maharashtra Private Security Guards (Regulation of Employment and Welfare ) Act. 1981 (Mah. LVIII of 1981 )**

Email : pdsgbpune@gmail.com, admin@PuneDistrictSecurityGuardBoard.in Web : www.punedistrictsecurityguardboard.in

**कार्यालय पत्ता : २९/२, शांतीकुंज, दुसरा मजला, सोमवार पेठ, पुणे - ४११ ०११.**

जा.क्र. पु.जि.सु.र.मं.पु. / दिनांक :

## आदेश

विषय :- पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा महागाई भत्ता दिनांक ०१ जुलै, २०२१ पासून करण्यात येणारी सुधारणा.

पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांचे वेतन भत्ते व इतर सेवा शर्ती पुर्ननिर्धारित ठराव क्र. ९१/२०१९ अन्वये निर्धारित केलेले आहे. मंडळाचे दि.१५/०६/२०१९ रोजीच्या आदेशान्वये दि. १ एप्रिल, २०१९ पासून वेतन व भत्ते पुर्ननिर्धारित करण्यात आलेले आहे.

मंडळाने दि.०१/०४/२०१९ रोजी सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते पुर्ननिर्धारित करतांना शासनाने 'दुकाने व व्यापारी आस्थापना' या अनुसुचित उदयोगासाठी वेळोवेळी जाहिर केलेला विशेष भत्ता सुरक्षा रक्षकांना लागू केलेला आहे. मंडळाने दि. ०१/०१/२०२१ ते दि.३०/०६/२०२१ या कालावधीत जाहिर केलेला विशेष भत्ता रू.१०९२/- इतका लागू केलेला होता. शासनाच्या सक्षम प्राधिकारी यांच्या दि. ०४/०८/२०२१ रोजीच्या क्र. ग्रा.वि./कि.वे.अ./वि.भ./२०२१(२)/कार्या-१०/६५०९ अधिसुचनेनुसार "कोणत्याही दुकानांतील व व्यापारी आस्थापनेतील कामधंदा" या अनुसुचित उद्योगातील कामगारांचे दि.०१/०७/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या कालावधींसाठी विशेष भत्त्यांचे दर रू.१४३०/- इतके निर्धारित करण्यात आलेले आहे.

मंडळाने दि.०७/०६/२०१९ रोजी केलेल्या ठराव क्र.९१/२०१९ नुसार केलेल्या वेतन पुर्ननिर्धारण आदेशात नमूद केल्याप्रमाणे उक्त नमूद अधिसुचना क्र. ग्रा.वि./कि.वे.अ./वि.भ./२०२१(२)/कार्या-१०/६५०९, दि.०४/०८/२०२१ प्रमाण मानून दि.०५/०८/२०२१ रोजी निर्णय घेऊन मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्त्यांत रू.१४३०-१०९२ = रू.३३८ वाढ करून दि.०१ जुलै, २०२१ ते दि. ३१ डिसेंबर, २०२१ या कालावधीकरीता दरमहा रू.५,१८४ + रू.३३८ = रू.५,५२२/- इतका निश्चित करून जाहिर करण्यात येत आहे.

पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ पुणे

(निखिल अ. वाळके)
सहायक कामगार आयुक्त, पुणे
तथा
अध्यक्ष
पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे.